# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **शीख धर्मीयांनी विवाह नोंदणी करीता घ्यावा महाराष्ट्र शासनाच्या आनंद विवाह नोंदणीचा लाभ – मिरा भाईंदर मनपाच्या वतीने शीख धर्मीयांना आवाहन**

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनिमय आणि विवाह नोंदणी नियम १९९९ नुसार राज्यात झालेल्या विवाहांची नोंदणी करून पक्षकारांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अधिनियम व नियमानूसार तसेच शासन परिपत्रकानुसार आरोग्य विभागामार्फत जून २०२४ पासून विवाह नोंदणी करणे सुरू झालेले आहे. या विवाहाची नोंदणी सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दि. २३ एप्रिल २०२० च्या अधिसूचनेनुसार सुधारित आनंद विवाह अधिनियम २०१२ च्या कलम ६ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानूसार महानगरपालिका स्तरावर प्रभाग अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

यास्तव मिरा भाईंदर शहरातील शीख धर्मियांना आवाहन करण्यात येते की, शहरातील जास्तीत शीख धर्मियांनी महाराष्ट्र शासन आनंद विवाह नोंदणीचा लाभ घ्यावा. जेणेकरून शीख समाजास कोणत्याही अडथळाविना सूलभरित्या विवाह नोंदणी करता येईल.

**राज्य आरोग्य माहिती व जीवनाविषयक आकडेवारी कार्यालय**
**महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**
डॉ. नायडू सासंगिक रुग्णालय आवार, केनडी रोड पुणे - ४११००१ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा (आ मा जी आ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे -०१

संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० - २६०५१५३०
नानोप विभाग : ०२० - २६०५८२९२
विवाह नोंदणी : ०२० - २६०५८६१०
ई -मेल : mahvivah@gmail.com

आरोग्य सेवा
विवाह नोंदणी

जा.क्र आमाजीआ/कक्ष-८२/आनंद वि.नों.मार्गदर्शन/6894-6992/२०२४
दिनांक : ०५/०७/२०२४

प्रति,
१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा विवाह निबंधक (जिल्हास्तर), जिल्हा परिषद ... (सर्व)
२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय ... (सर्व)
३) आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ... (सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विवाह निबंधक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
५) मुख्याधिकारी तथा विवाह निबंधक, नगरपालिका ... (सर्व)
६) मुख्याधिकारी तथा विवाह निबंधक, नगरपंचायत ... (सर्व)
७) मुख्याधिकारी तथा विवाह निबंधक, कटक मंडळे ... (सर्व)

विषय- आनंद विवाह नोंदणी अधिनियम १९०९ (सुधारित२०१२) च्या प्रभावी अंमल बजावणी साठी जागरुकता निर्माण करणेसाठी प्रसिद्धी देणेबाबत...

संदर्भ -
१) केंद्र शासनाचा आनंद विवाह नोंदणी अधिनियम १९०९ (सुधारित२०१२) दि ८/६/२०१२
२) महाराष्ट्र आनंद विवाह नोंदणी नियम २०२० दि २३/४/२०२०
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि २३/४/२०२०
४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग याचे क्रमांक विनोका - २०१२/प्र.क्र३८७/कु क दि. २७/०५/२०२४

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते कि,

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ नुसार राज्यात झालेल्या विवाहांची नोंदणी करून पक्षकारांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते. संदर्भ क्र १ ते ३ च्या शासन नियम व अधी नियम तसेच संदर्भ क्र ४ च्या शासन परिपत्राकानुसार आरोग्य विभागामार्फत माहे जून २०२४ पासून आनंद विवाह नोंदणी करणे सुरु झालेले आहे.

या विवाहाची नोंदणी सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दि २३ एप्रिल २०२० च्या अधिसूचनेनुसार सुधारित आनंद विवाह अधिनियम २०१२ च्या कलम ६(१) अन्वये प्रधान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन आनंद विवाह नोंदणीसाठी विवाह निबंधक म्हणून १)महानगरपालिका - संबधित प्रभाग अधिकारी २)नगरपालिका/ नगरपरिषद /नगरपंचायत/कटक मंडळे- संबधित मुख्याधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे

सर्व विवाह निबंधक (जिल्हा स्तर) तसेच विवाह निबंधक (महानगरपालिके मधील संबधित प्रभाग अधिकारी तसेच नगरपालिका/ नगरपरिषद /नगरपंचायत /कटक मंडळे) यांना विनंती करण्यात येते की त्यांनी आनंद विवाह नोंदणी आरोग्य विभागामार्फत सुरु करण्यात आलेली आहे याबाबत शीख धर्मीय समाजात जागरूकता निर्माण व्हावी यासाठी आपल्या स्तरावरुन

वर्तमान पत्रात बातमी देऊन, तसेच सर्व गुरुद्वारा आणि शीख समाज संघटना याना परिपत्रक देऊन भरपूर प्रमाणात प्रसिद्धी करण्यात यावी जेणेकरून शीख समाजाचे विवाह महाराष्ट्र शासन आनंद विवाह नोंदणी अंतर्गत नोंदविण्यात या समाजाला काही अडचण येणार नाही. तसेच दरमहा आनंद विवाह अंतर्गत किती विवाह नोंदविले गेले आहेत यांची माहिती या कार्यालयास विवाह निबंधक (जिल्हा स्तर) यांचे मार्फत सादर करण्यात यावी.

(डॉ.आर .टी.वाघमारे)
उपसंचालक आरोग्य सेवा
(आ.मा.जी.आ.) तथा निबंधक,
विवाह मंडळ व विवाह नोंदणी
(विभागस्तरीय समन्वय ).
महाराष्ट्र राज्य ,पुणे

प्रत माहिती स्तव सविनय सादर :

१) मा अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
नवीन मंत्रालय लोकमान्य टिळक मार्ग, गो. ते. रुग्णालय आवार,मुंबई-४००००१

२) मा संचालक आरोग्य सेवा, तथा निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी
(राज्यस्तरीय), आरोग्य भवन, महाराष्ट्र राज्य ,पुणे ४००००१